


# PRESS COVERAGE

---

# LAUNCH of the MARATHI EDITION of “THE MAKING OF HERO” (05.08.2023)

---

1. Sakal Daily (Marathi): 06.08.2023

सकाळ

# उलगडला यशस्वी उद्योजकतेचा मूलमंत्र

## 'हिरोची यशोगाथा' पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त चर्चासत्र; विविध विषयांवर विचारमंथन

**पुणे, ता. ५ :** सर्वोत्तमतेचा ध्यास, कुटुंबाची मूल्यसंस्था, व्यवसायातील बांधिलकी आणि समृद्ध नातेसंबंध हाच खऱ्या अर्थाने यशस्वी उद्योजकतेचा मूलमंत्र आहे, असा सूर 'काळानुसार बदलणारी उद्योजकता' या चर्चासत्रात उमटला. बाणेर रस्त्यावरील यशदा संस्थेत 'हिरोची यशोगाथा' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात हे चर्चासत्र पार पडले.

हिरो कंपनीचे अध्यक्ष सुनील कांत मुंजाल लिखित या पुस्तकाचा मराठी अनुवाद मीना शेटे-शंभू यांनी केला आहे. चर्चासत्रात मुंजाल यांसह बजाज फिनसर्व्हचे व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया, एमक्युअर फार्मास्युटीकल्सच्या कार्यकारी संचालक नमिता थापर सहभागी झाले होते. देशातील आघाडीचे ३०० उद्योग हे कुटुंबांद्वारे चालवले जात असून, सहज उपलब्ध होणारे भाग भांडवल आणि संपुष्टात आलेल्या 'लायसन्स राज'मुळे समाजातील सर्व घटक यशस्वी नवउद्योजक होऊ शकतात, असा मुद्दाही या चर्चासत्रात मांडण्यात आला.




**यशदा, बाणेर रस्ता :** 'काळानुसार बदलणारी उद्योजकता' या विषयावर चर्चासत्रात (डावीकडून) संजीव बजाज, सुनील मुंजाल, परीक्षित लुथ्रा, डॉ. अभय फिरोदिया आणि नमिता थापर.

डॉ. फिरोदिया म्हणाले, ''फाळणीनंतर पाकिस्तानातून आलेले हिरोचे प्रमुख संस्थापक ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी अत्यंत प्रतिकूल वातावरण असतानाही आत्मविश्वास, जिद्द आणि धडाडीच्या जोरावर आपले साम्राज्य उभारले. खासगी क्षेत्रच खऱ्या अर्थाने देशाचे विकास इंजिन आहे.'' हिरो ग्रुपने जपलेल्या व्यावसायिक बांधिलकीमुळे आज कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये आमच्याविषयी विश्वासार्हता निर्माण झाली आहे, असे मुंजाल यांनी सांगितले.

### महिला आणि उद्योग क्षेत्राचे नुकसान...

- उद्योग क्षेत्रात फक्त २.३ टक्के महिलांचे नेतृत्व असल्याचे नमिता थापर यांनी सांगितले. त्यामुळे महिलांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावर सुनील मुंजाल म्हणाले, "भारतीय उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग नसल्यात जमा आहे, त्यामुळे एका मोठ्या औद्योगिक क्रांतीला आपण मुकलो आहोत. बहुआयामी आणि कौशल्यप्राप्त महिलांना मुख्य प्रवाहात आणायला हवे."

### नवउद्योजकांना मूलमंत्र...

- व्यावसायिक आणि सामाजिक बांधिलकी जोपासा
- तंत्रज्ञानाला पर्याय नसून, ते निरंतर आत्मसात करा
- कौटुंबिक मूल्यावरच उद्यमशीलतेचा पाया
- उद्योगात सर्वोत्तम प्रज्ञेला संधी द्या

बजाज म्हणाले, ''ब्रिजमोहनलाल यांनी नातेसंबंध जपण्याला नेहमीच प्राधान्य दिले. आजच्या काळात भांडवल उभारणी, तंत्रज्ञान यामुळे नवउद्योजकांना असंख्य संधींची द्वारे खुली झाली आहेत. पण, मुंजाल यांनी मात्र त्या प्रतिकूल काळात कर्तृत्व सिद्ध केले.'' संगीता काळे यांनी सूत्रसंचालन केले.

2. Maharashtra Times (Marathi): 06.08.2023

# 'एआय'मुळे बदलांबाबत अस्पष्टता

## उद्योजकांच्या चर्चासत्रात सूर

**म. टा. प्रतिनिधी,** पुणे

'सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) जगभरात विविध प्रकारची चर्चा सुरू असून, त्यामुळे भविष्यात मोठे बदल होण्याचे संकेत देण्यात येत आहेत. परंतु, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नेमके भविष्यात कोणत्या स्वरूपाचे बदल होतील याबाबत सर्वच अनभिज्ञ आहेत,' असा सूर उद्योजकांनी शनिवारी व्यक्त केला.

यशदा सभागृहात 'हिरोची यशोगाथा' या उद्योजक सुनील कांत मुंजाल लिखित, मीना शेटे-संभू अनुवादित आणि मंजुल पब्लिशिंग हाउसतर्फे प्रकाशित पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन झाले. पुणे इंटरनॅशनल सेंटरने हा कार्यक्रम आयोजित केला होता. पुस्तकाचे लेखक सुनील कांत मुंजाल, उद्योजक संजीव बजाज, डॉ. अभय फिरोदिया, नमिता थापर, मंजुल पब्लिशिंग हाउसचे प्रकाशक विकास रखेजा, मुख्य संपादक चेतन कोळी आदी या वेळी उपस्थित होते. प्रकाशनानंतर 'काळानुसार बदलणारी उद्योजकता' या विषयावर चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण, महिलांचे सबलीकरण, शिक्षणातील व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम यासारख्या मुद्द्यांवर उद्योजकांनी प्रकाश टाकला.

ज्येष्ठ उद्योजक अभय फिरोदिया म्हणाले, 'कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात काय घडेल याबाबतचे चित्र अद्याप अस्पष्ट आहे. त्याच्या बदलांबाबत सांगणे शक्य होणार नाही.'

'कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगारावर सध्या परिणाम होत आहेत. त्यामुळे साधे आणि एकाच पद्धतीच्या रोजगारांची निर्मिती कमी होईल. त्यामुळे नवनवीन संधी निर्माण होतील. कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे जगात उलाथपालथ होणार असली, तरी भविष्यातील चित्र आताच कोणालाही सांगता येणार नाही,' असे बजाज यांनी म्हणाले.

'पाकिस्तानातून आलेले ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी प्रतिकूल वातावरणात असतानाही आत्मविश्वास, जिद्द आणि धडाडीच्या जोरावर कंपनी उभारली,' असे फिरोदिया म्हणाले. 'हिरो ग्रुपने जपलेल्या व्यावसायिक बांधिलकीमुळे आज कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये आमच्याविषयी विश्वासार्हता निर्माण झाली आहे,' असे पुस्तकाचे लेखक सुनील कांत मुंजाल म्हणाले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन परीक्षित लुथ्रा यांनी केले.

### 'अभ्यासक्रमात बदल झाला पाहिजे'

'अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा सातत्याने दर तीन वर्षांनी आढावा घेतला गेला पाहिजे. त्या अभ्यासक्रमात बदल होणे अपेक्षित असून, अनेक वर्षांपासून एकच अभ्यासक्रम राहिला, तर उद्योगांना नेमके काय बदल अपेक्षित आहेत ते त्यात येणार नाहीत. त्यामुळे काळानुरूप अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन बदल घेणे अपेक्षित आहे,' असे संजीव बजाज यांनी सांगितले.

3. Loksatta (Marathi): 06.08.2023

# कृत्रिम प्रज्ञेबद्दल चित्र अद्याप धूसर

## आघाडीच्या उद्योजकांचे मत

**पुणे :** कृत्रिम प्रज्ञेमुळे जगात मोठ्या प्रमाणात उलथापालथ होत आहे. यामुळे रोजगारावर गंडांतर येईल, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. याचबरोबर भविष्यातील चित्र पूर्णपणे पालटलेले दिसेल, अशीही चर्चा सुरू आहे. प्रत्यक्षात कृत्रिम प्रज्ञेबद्दलचे चित्र अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे मोठे बदल होणार असले, तरी ते नेमके कशा प्रकारचे असतील हे आताच सांगता येणार नाही, असे मत आघाडीच्या उद्योजकांनी शनिवारी व्यक्त केले.

पुण्यातील यशदा सभागृहात 'हीरोची यशोगाथा' या उद्योजक सुनील कांत मुंजाललिखित, मीना शेटे-संभू अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी सुनील कांत मुंजाल, उद्योजक संजीव बजाज, डॉ. अभय फिरोदिया, नमिता थापर, मंजुल पब्लिशिंग हाउसचे प्रकाशक विकास रखेजा, मुख्य संपादक चेतन कोळी आदी उपस्थित होते.

पुस्तक प्रकाशनानंतर 'काळानुसार बदलणारी उद्योजकता' या विषयावर चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात कृत्रिम प्रज्ञा या विषयावर उद्योजकांनी मते मांडली. कृत्रिम प्रज्ञेमुळे भविष्यात काय घडेल, याबाबतचे चित्र अस्पष्ट असून, आताच त्याबद्दल सांगणे शक्य होणार नाही, असे मत डॉ. फिरोदिया यांनी व्यक्त केले.

बजाज यांनी कृत्रिम प्रज्ञेमुळे रोजगारावर सध्या होत असलेल्या परिणामांबाबत भाष्य केले. ते म्हणाले, की कृत्रिम प्रज्ञेमुळे साधे आणि एकाच साच्याचे रोजगार कमी होतील. मात्र, त्यामुळे नवनवीन संधी निर्माण होतील. कृत्रिम प्रज्ञेमुळे उलथापालथ होणार असली, तरी भविष्यातील चित्र आताच कोणी सांगू शकत नाही.

हीरो ग्रुपने जपलेल्या व्यावसायिक बांधिलकीमुळे आज कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये आमच्याविषयी विश्वासार्हता निर्माण झाली आहे, असे पुस्तकाचे लेखक सुनील कांत मुंजाल म्हणाले. पाकिस्तानातून आलेल्या ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी अत्यंत प्रतिकूल वातावरण असतानाही आत्मविश्वास, जिद्द आणि धडाडीच्या जोरावर आपले साम्राज्य उभारले, असे मत डॉ. फिरोदिया यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संगीता काळे यांनी केले, तर चर्चासत्राचे सूत्रसंचालन परीक्षित लुथ्रा यांनी केले.

### महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्याची गरज

नमिता थापर यांच्यासह सर्व उद्योजकांनी महिलांचे प्रतिनिधित्व उद्योगांमध्ये वाढविण्याचे मत व्यक्त केले. सातत्य, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्ती हीच यशस्वी उद्योजकतेची मूलभूत तत्त्वे असल्याचे मत थापर यांनी व्यक्त केले. महिला उद्योजकांची संख्या समाजात कमी असून, महिलांना उद्योजकतेसाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहित करण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.



**'हीरोची यशोगाथा' या उद्योजक सुनील कांत मुंजाललिखित पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन शनिवारी झाले. या वेळी उपस्थित मान्यवर.**

4.Lokmat (Marathi): 07.08.2023

लोकमत

'काळानुसार बदलणारी उद्योजकता' परिसंवादातील सूर

# मूल्ये, नियोजन अन् धडाडीमुळेच उद्योगभरारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मूल्यांची जपणूक, नियोजन, धडाडीमुळेच उद्योगभरारी घेता येते, असाच सूर ज्येष्ठ उद्योजकांच्या उपस्थितीत शनिवार पार पडलेल्या एका परिसंवादातून उमटला.

'हिरोची यशोगाथा' हे पुस्तक नुकतेच पार पडले. प्रकाशनादरम्यान आयोजित परिसंवादात पुस्तकाचे लेखक हिरो ग्रुपचे अध्यक्ष सुनीलकांत मुंजाल, 'बजाज ग्रुप'चे चेअरमन संजीव बजाज, 'फोर्स मोटर्स'चे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया, उद्योजिका नमिता थापर यांनी व्यक्त केले.

यशदा सभागृह येथे 'हिरोची यशोगाथा' या सुनीलकांत मुंजाळलिखित, मीना शेटे-संभू अनुवादित आणि मंजुल पब्लिशिंग हाउसतर्फे प्रकाशित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे आयोजित करण्यात आला होता. पुस्तक प्रकाशनानंतर 'काळानुसार बदलणारी उद्योजकता' या विषयावर चर्चासत्र पार पडले.

सुनीलकांत मुंजाल म्हणाले, 'उद्योग उभारताना ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी माणसं जोडली. व्यवसायसोबत मूल्यांनाही महत्त्व दिले.' संजीव बजाज म्हणाले, 'ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी नातेसंबंध जपण्याला नेहमीच प्राधान्य दिले. बजाज आणि मुंजाल या दोन परिवारांनी ऑटोमोबाइल क्षेत्रात

या चर्चासत्राचे सूत्रसंचालन परीक्षित लुथ्रा यांनी केले. तर विकास रखेजा, मुख्य संपादक चेतन कोळी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



'काळानुसार बदलणारी उद्योजकता' परिसंवादात बोलताना मान्यवर.

## मुंजालनी ओळखले होते मोटारसायकलीचे भविष्य

डॉ. अभय फिरोदिया म्हणाले, '१९५० मध्ये निर्माण होणारे उत्पादन हे वर्कशॉपमधून निर्माण होत होते. मागणी किती होती याचा विचार न करता ब्रिजमोहनलाल यांनी या मोठ्या स्तरावर उत्पादन घेतले. मोटारसायकल भविष्य आहे हे त्यांनी ओळखले होते. ब्रिजमोहनलाल मुंजाल यांनी अत्यंत प्रतिकूल वातावरणातही आपले साम्राज्य उभारले.

## महिलांना प्रोत्साहित करण्याची गरज

सातत्य, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्ती हीच यशस्वी उद्योजकतेची मूलभूत तत्त्वे असल्याचे मत नमिता थापर यांनी व्यक्त केले. महिला उद्योजकांची संख्या आपल्या समाजात कमी असून महिलांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित करावे, असेही त्या म्हणाल्या.

## उद्योजक घराण्यांमुळे अर्थव्यवस्थेला गती

जगात उद्योजक घराण्यांच्या पहिल्या दोन पिढ्यांनंतर तिसऱ्या पिढीमध्ये उद्योगाला ओहोटी लागते. भारताच्या अर्थव्यवस्थेत येथील ३०० उद्योजक घराणी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. या उद्योजक घराण्यांमुळे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा उचलत आहेत, असे मुंजाल म्हणाले.

5. The Times of India (English): 06.08.2023

# Need to transfer biz learnings to social sector: Hero's Sunil Munjal

TIMES NEWS NETWORK

**Pune**: There is a need to transfer the learnings of efficiency and productivity from business to the social sector to help bridge the income disparity gap in society caused by the market economy that India follows, **Sunil Munjal**, the chairman of Hero Enterprise, said.



"The compact between industry and civil society needs to change. The disparity in incomes is created due to the wonderful market economy we follow, and it is causing friction, deep disappointment and making a lot of people angry," Munjal said at the launch of the Marathi version of his book "The Making of Hero: Four Brothers, Two Wheels and a Revolution that Shaped India".

The book event, organised by the Pune International Centre.

Munjal said a lot of companies today are transferring the learnings in social area such as education, healthcare, gender issues, clean drinking water through corporate social responsibility (CSR). Businesses are able to bring efficiency to social sector because they have learnt how to build efficiency with the available resources, he added.

The principles of efficiency are equally important for family-owned businesses as the next generation which takes over should imbibe the philosophy of the way the business is run, Munjal said. Around the world, 95% of family-owned businesses are destroyed by the time the third generation takes over as they lose efficiency, he said.